कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील सहायक आयुक्त (गट-अ) या संवर्गातून उप आयुक्त (गट-अ) या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन आदेश क्र. कौविउ-२०२५ /प्र.क्र.३०९ /प्रशा-२ (E-1497229)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ एप्रिल, २०२६.

**संदर्भ** :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२००८/प्र.क्र.१५९/कार्या-१२, दि. ०१.०८.२०१९,
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र. ४९/कार्या.१२, दि. १४.०७.२०२१,
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एमआयएन-१२२४/प्र.क्र.१५०/कार्या.२१ (मंआस्था-१), दि. १४.०१.२०२५,
४) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांचे पत्र क्र. कौविरोवउआ-२/राजप/आस्था/(३७/२०२५)/९७७५, दि. २०.११.२०२५.

**शासन आदेशः-**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील सहायक आयुक्त [गट-अ (वेतनश्रेणी एस-१८ : ₹४९,१००-१,५५,८००)] या संवर्गातून उप आयुक्त [गट-अ (वेतनश्रेणी एस-२३: ₹ ६७,७००-२,०८,७००)] या पदावर सन २०२५-२६ या वर्षाच्या नियमित निवडसूचीमधून खालील अधिकाऱ्यास या आदेशाद्वारे विहित केलेल्या अटींच्या अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्याची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे:-

| अ..क्र | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | अधिकाऱ्याचा प्रवर्ग | सध्याचे कार्यालय | पदोन्नतीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. शरद जयसिंग खाडे, सहायक आयुक्त | भ.ज. (ड) | प्रतिनियुक्ती मा. मंत्री (परिवहन) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई. | **प्रपत्र बढती** मा. मंत्री (परिवहन) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई. |

२. श्री. श. ज. खाडे, सहायक आयुक्त यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या कालातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम, ४० परिशिष्ट -२, अट क्र. १८ नुसार उप आयुक्त, गट-अ या पदावर प्रपत्र बढती देण्यात येत

असून सदर तरतुदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील.

३. श्री. श.ज.खाडे, सहायक आयुक्त यांना पुढील अटींच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे:-

१) निवडसूची तयार करताना कोणीही ज्येष्ठ अधिकारी अनावधानाने वगळण्यात आलेले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत.

२) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि. २५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग/१६-ब कार्यासनाच्या दि. ०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच दि. ०७.०५.२०२१ च्या शासन निर्णय प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून, त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

३) सदर पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४) सदर पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द या आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५) श्री. श.ज.खाडे, सहायक आयुक्त यांनी प्रपत्र बढतीच्या पदावर रुजू झाल्याचा अनुपालन अहवाल शासनाकडे तात्काळ सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४१७१८०४३६५२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
Date: 2026.04.17 18:05:56 +05'30'

**( वैशाली सुळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा. मंत्री (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता )यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) अपर मुख्य सचिव (सेवा ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२, (लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई/नागपूर,
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, ( लेखा परीक्षा ),मुंबई/नागपूर,
७) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई,
८) उपसचिव (कार्या-मंआस्था), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) सर्व उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामार्फत),

१०) सर्व सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामार्फत),

११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामार्फत),

१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयामार्फत),

१३) निवड नस्ती ( प्रशा-२).